**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ०१/०८/२०१८

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०४ शनिवार दि.४/०८/२०१८ रोजी दुपारी १.०० वा.**महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**शनिवार दिनांक - ४ /०८/२०१८ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| २८ | अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा या कामाची ई - निविदा क्र.१७५८ नुसार खाजगी अभिकर्ता संस्थेकडून BOO तत्वावर उपक्रम राबविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २९ | अहमदनगर महानगरपालिकेची आरोग्य मोटार व्हेईकल,फायर फायटर ,अतिक्रमण विभागाकडील जुन्या झालेल्या वाहनांची लिलावाव्दारे विक्री करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३० | अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह ) कामी ई - निविदा क्र.१५६२ करिता मे.दिपाली ट्रन्सपोर्ट यांनी सादर केलेली निविदा दरांची निविदा मान्यतेस्तव ऑफिस रिपोर्ट. |
| ३१ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागाकरीता महानगरपालिकेने खरेदी केलेल्या २ नग टाटा -४०७ चेसीवर हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणेबाबत मे.मणियार ॲण्ड कंपनी यांचे निविदा दर मान्यतेस्तव ऑफिस रिपोर्ट. |
| ३२ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये केंद्र सरकारच्या मालकीचे रेल्वेस्टेशन मिळकतीचे मालमत्ता कर व इतर कर वॉर्ड क्र.२४ बिल नं.५०८ वरील इतर कर रद्द करून सेवा कराचे बील देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ३३ | अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक व विजतंत्री यापदांवर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३४ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीकल विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या सेवानिवृत्त इंजिनिअर यांना मुदतवाढ मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १**]** विषय क्रमांक- २८ ते ३४ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- २८ शनिवार दि.०४/०८/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा या कामाची ई - निविदा क्र.१७५८ नुसार खाजगी अभिकर्ता संस्थेकडून BOO तत्वावर उपक्रम राबविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

**संदर्भ :-** १] दिपाली ट्रान्सपोर्ट,अहमदनगर यांचे पत्र दि.१२/०६/२०१८

२] दिपाली ट्रान्सपोर्ट,अहमदनगर यांचे पत्र दि.१४/०६/२०१८

३] श्री.प्रदिप एम.भंडारी व रोहीत पी.भंडारी यांनी पाठविलेली नोटीस.

मा.सादर

उपरोक्त संदर्भ व विषयाचे अनुषंगाने जास्तीचे स्वमित्वधन (रॉयल्टी) देणारे एजन्सी मे.दिपाली ट्रन्सपोर्ट,अहमदनगर यांचेशी दि.०८/०६/२०१८रोजी वाटाघाटी करण्यात आली.वाटाघाटी अनुषांगाने प्राप्त पत्र व या संदर्भात प्राप्त नाटीस पुढीलप्रमाणे.

१] शहर बससेवे संदर्भात निविदाधारक मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांना स्वामित्वधनाबाबत वाटाघाटी करणेकामी महानगरपालिकेमध्ये बोलविण्यात येवून मा.उपायुक्त (कर) मा.उपायुक्त (सा) मुलेप,मुलअ,मेकॅ.इंजि.संबंधित संस्थेचे प्रतिनिधी यांचेशी दि.०८/०६/२०१८ रोजी चर्चा झालेली आहे.मे.दिपाली ट्रन्सपोर्ट यांनी निविदेमध्ये रक्कम रूपये २०२५/- भरलेली आहे.वाटाघाटी अंती स्वामित्वधन वाढवून प्रतिबस प्रतिमहा रूपये २२००/- केली असून तसे लेखी पत्र इकडेस सादर केले आहे.

२] तसेच मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांचे दि.१४/०६२०१८ चे संदर्भीय पत्रानुसार महानगरपालिका महासभेत जो ठराव पारीत केलेला आहे.त्या ठरावाप्रमाणे मिळणारे अनुदान आमचे संस्थेला देखील देण्यात यावे.सदर अनुदान आमचे संस्थेला मिळणार नसेल तर आम्ही अहमदनगर शहर बस वाहतूकीचा ठेका घेण्यास इच्छूक नाहीत.याची नोंद घेण्यात येवून तसे आम्हास कळविणेत यावे असे पत्र सादर केलेले आहे.

३] संदर्भिय क्र.३ अन्वये नोटीस प्राप्त असून त्यात शहर बससेवेबाबत नव्याने निविदा प्रसिध्द करण्यात येवून बससेवेसाठी बसेसचे आर.सी.बूक,पीयुसी प्रमाणपत्र बस मालकी संदर्भात कागदपत्रे,कर्मचारी यादी अशा अटी नमूद करून निविदा प्रसिध्द केली आहे.निविदेनुसार गाडे ट्रन्सपोर्ट,दिपाली ट्रन्सपोर्ट,वाही ट्रन्सपोर्ट यांनी निविदा सादर केल्या आहेत.माहिती आधिकारान्वये महानगरपालिकेने निविदेबाबत माहिती दिलेली असून निविदाधारकांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही.तरी देखील इच्छुक ठेकेदारास बससेवा देणेबाबत प्रयत्न सुरू आहेत.पूर्वीचे ठेकेदार कोर्टात गेले असून कागदपत्रांची अपूर्णता असल्याने निविदा मंजूर करू नये अथवा रद्द करण्यात यावी असे कळविले आहे.या अनुषंगाने

१] दि.०८/०६/२०१८ रोजी झालेल्या वाटाघाटीनंतर व मे.दिपाली ट्रन्सपोर्ट यांचे दि.१४/०६/२०१८ चे प्राप्त पत्रानुसार मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांचे स्वमित्वधन रक्कम प्रतिमाह प्रतिबस रू.२२००/-ग्राह्य धरणे योग्य.

२] मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांचे दि.१४/०६/२०१८ च तोटा व नुकसान भरपाई पोटीचे अनुदान मागणीचे पत्र योग्य नसुन बससेवा न चालविताच तोटा गृहीत धरून अनुदान मागणी योग्य वाटत नाही.

शहर बस वाहतुम उपक्रमापोटी तोटा व नुकसान भरपाई संबंधीत अभिकर्ता संस्थेस देणे बाबत मा.महासभा ठराव क्र.१० दि.०५/०७/२०१४ अन्वये पारीत झालेला आहे.यात रू.५.००लाख पर्यतची रक्कम देणेबाबत नमूद आहे.

यापुर्वी निविदेच्या अटी व शर्तीमध्ये मा.महासभा ठराव क्र.१० दि.०५/०७/२०१४ नुसार दयावयाची दरमहा नुकसानन व भरपाई रक्कम रूपये ५.०० लाख याचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता.मा.महासभेच्या ठरावाप्रमाणे करारनाम्यात सदरची अट नमुद करण्यात आली होती व त्यानुसार

तत्कालीन अभिकर्ता संस्था मे.यशवंत ॲटो प्रा.ली.या संस्थेस दरमहा तोटा व नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात येत होती.

३] ॲडव्होकेट श्री.प्रदीप भंडारी व ॲडव्होकेट रोहित भंडारी यांची नोटीस प्राप्त झालेली असून त्यात त्यांनी नविन ठेकेदार नेमणेस पूर्वीचे अभिकर्ता संस्थेशी मे.कोर्टात दावा प्रलंबित असल्याने व नविन ठेकेदाराकडील कागदपत्रे अपूर्ण असल्याचे कारण देवून हरकत घेतलेली आहे.परंतू मागील ठेकेदाराने मा.न्यायालयात दावा दाखल केलेला असून याबाबत मा.न्यायालयाने कोणतीही स्थगिती दिलेली नाही.तसेच नविन अभिकर्ता संस्थेची नेमणूक करतांना प्राप्त ठेकेदाराचे कागदपत्रे पाहाता प्रत्यक्ष शहर बस सेवेचा अनुभव वगळता योग्य आहेत.

प्राप्त ठेकेदारांकडे शहर बस वाहतूकीचा प्रत्यक्ष अनुभव नाही.परंतू ट्रान्सपोर्ट व्यवसायाचा अनुभव असल्याने गृहीत धरणे योग्य असल्याने या बाबत मा.उपायुक्त (कर) यांचे मंजूरीने शिथिल करण्यात आलेली आहे.

त्यामुळे सदरच्या नोटीशीस वरील प्रमाणे उत्तद देणे योग्य.

यास्तव शहरबस सेवा उपक्रमासाठी प्राप्त ठेकेदारांचा ट्रन्सपोर्ट व्यवसायाचा अनुभव ग्राह्य धरून,जास्तीचे स्वमित्वधन देणारे मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांची वाटाघाटी अंती अंतीम झालेले स्वमित्वधन रू.२२००/-प्रति बस प्रति माह ग्राह्य धरणेस,तसेच तोटा व नुकसान भरपाई अनुदान दयावे किंवा कसे ? याबाबत अंतीम धोरण ठरविणेस संपूर्ण प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य.

येणे प्रमाणे मोटारव्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मेकॅनिकल इंजी यांचा अभिप्राय की,अहवालात नमूद प्रमाणे सर्व परिस्थिती मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणून त्यानुसार निर्णय घेणे योग्य राहिल.

करिता सदरील प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे निर्णयास्तव पाठविणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,उपरोक्त स्थायी समितीमध्ये निर्णय होणे अपेक्षित तथापी उचित कार्यवाहीस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्या प्रमाणे अनु.क्र.१ ते ३ बाबत धोरणात्मक मान्यतेस्तव मा.स्थायी समिती कडे सादर करणे बाबत विभागाला उचित निर्णय घेता येईल.

यावर उपायुक्त(कर) यांचा अभिप्राय की,मुलेप यांच्या शिफारशीनुसार सदर चा विषय मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवाला मधिल पान क्र.T-४२ मध्ये नमूद अनु.क्र.१ ते ३ प्रमाणे धारणात्मक निर्णया करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे कामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा या कामाची ई - निविदा क्र.१७५८ नुसार खाजगी अभिकर्ता संस्थेकडून BOO तत्वावर उपक्रम राबविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- खरात साहेब आपण प्रत्येक प्रकरणात स्वयंस्पप्ट शेरा देता.परंतु या प्रकरणावर आपला शेरा स्पष्ट का लिहीलेला नाही.

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- माझा अभिप्रय स्पष्ट आहे.नुकसान व भरपाई देणे बाबतचा ठराव दि.५/७/१४ रोजी महासभेमध्ये पारीत झालेला आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नविन ठेकेदाराला हा ठराव लागू होत नाही.

मा.सभापती :- दि.५/७/१४ रोजी महासभेमध्ये नुकसान व भरपाई रू.५ लाख देणेबाबत ठराव झालेला आहे.

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- विभागाने प्रस्तावित केला आहे.माझे त्यावर काही म्हणणे नाही.

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- शहर बस सेवा उपक्रम संदर्भात दि.५/७/१४ राजी जो ठराव पारीत झाला आहे.तो मी वाचून दाखवतो.ठरावाचे वाचन करण्यात आले.हा ठराव नविन ठेकेदारासाठी सुध्दा लागु होतो.धोरनात्मक निर्णय आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- किती बसेस चालविल्यावर नुकसान भरपाई देणार असे काही असेल ना?

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- किमान १४ ते २० बसेस चालविल्यावर रू.५ लाख नुकसान व भरपाई दयावी.व १५ पेक्षा कमी बसेस चालविल्यास तर कमी पैसे दयावे.मुद्दा क्र.१४ मध्ये १५ ते ३० बसेस वापरल्यातरच रू.५ लाख नुकसान व भरपाई दयावी.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- ठेकेदार किती बसेस चालविणार आहे.

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- आपण त्यांना १५ ते ३० बसेस चालविण्यास सांगीतले आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ठेकेदारा चांगल्या बसेस चालविणार आहे का? दुस-या शहरामध्ये वापरलेल्या जुन्या बसेस ठेकेदाराने दिल्या नाही पाहिजे.सर्व बसेस नविन पाहिजे.पुर्वीच्या ठेकेदाराने जुन्या बसेस आणल्या होत्या.बसेसवर कोणाचा कंट्रोल असणार आहे.

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- बसेसवर आपलाच कंट्रोल राहणार आहे.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- मागील ठेकेदाराच्या बसेस अत्यंत खराब होत्या.खिडक्यांना काचा नाही.निकामी बसेस शहरामध्ये त्यांनी चालविल्या.कोठेही बंद पडायच्या त्यामुळे महानगरपालिकेची बदनामी झाली होती.त्यांना पैसे देवून सुध्दा त्यात त्यांनी सुधारणा केली नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आत्ता आपण नविन एजन्सीला मंजूरी देणार आहे.ठेकेदाराने जर नविन बसेस घेतल्या,बसेसची पासिंग सन २०१८ ची असली पाहिजे या अटीवर ठेका दया.नविन गाडया असतील तरच रू.५ लाखा नुकसान भरपाई दयायचे.

मा.सभापती साहेब :-बससेवा देण्याचा करार करतांना नविन बसेस चालविल्या पाहिजे.चांगली सेवा पाहिजे,व्यवस्थापन चांगले पाहिजे.अशापध्दतीने करार करा.नुकसान भरपाई ही ठेकेदाराचे जर नुकसान झाले तरच देण्यात येईल.

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- बस सेवेसाठी नविन विभागाची नेमणूक करण्यात यावी.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- पुर्वीपासून विभागाची नेमणूक केलेली नाही.लवकरात लवकर स्वतंत्र्य विभाग स्थापन करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- बसेससाठी स्वतंत्र्य नविन विभाग तयार करायचा असेल तर आकृतीबंधामध्ये समाविष्ट करून मंजूरी घ्यावी लागेल.बस सेवा आपण बी.ओ.ओ.तत्वावर बससेवा सुरू करणार आहे.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- महिलांकरीता स्वतंत्र्य राखीव बस ठेवण्यात यावी.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- महिला व शालेय मुलांकरीता स्वतंत्र्य बस ठेवण्यात यावी.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- मागील ठेकेदाराचे पैसे दिले आहेत का?

अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- प्रकरण न्ययप्रविष्ठ असल्यामुळे पैसे दिलेले नाहीत.

मुदस्सर शेख :- पुर्वीचा ठेकेदार कार्टात गेला आहे का.कय मागणी आहे त्याची ?

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- संदर्भिय क्र.३ अन्वये नोटीस प्राप्त असून त्यात शहर बससेवेबाबत नव्याने निविदा प्रसिध्द करण्यात येवून बससेवेसाठी बसेसचे आर.सी.बूक,पीयुसी प्रमाणपत्र बस मालकी संदर्भात कागदपत्रे,कर्मचारी यादी अशा अटी नमूद करून निविदा प्रसिध्द केली आहे.निविदेनुसार गाडे ट्रन्सपोर्ट,दिपाली ट्रन्सपोर्ट,वाही ट्रन्सपोर्ट यांनी निविदा सादर केल्या आहेत.माहिती आधिकारान्वये महानगरपालिकेने निविदेबाबत माहिती दिलेली असून निविदाधारकांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही.तरी देखील इच्छुक ठेकेदारास बससेवा देणेबाबत प्रयत्न सुरू आहेत.पूर्वीचे ठेकेदार कोर्टात गेले असून कागदपत्रांची अपूर्णता असल्याने निविदा मंजूर करू नये अथवा रद्द करण्यात यावी असे कळविले आहे.

मा.मुदस्सर शेख :- निविदेतील ठेकेदाराचं कागदपत्रे पुर्ण आहेत का?

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- प्राप्त ठेकेदारांकडे शहर बस वाहतूकीचा प्रत्यक्ष अनुभव नाही.परंतू ट्रान्सपोर्ट व्यवसायाचा अनुभव असल्याने गृहीत धरणे योग्य असल्याने या बाबत मा.उपायुक्त (कर) यांचे मंजूरीने शिथिल करण्यात आलेली आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :-ठेकेदाराने सुस्थीतील चांगल्या बसेस चालविल्या पाहिजे,१५ते ३०बसेच दररोज चालविल्या पाहिजे,नागरीकांच्या दृष्टीने आवश्यक असलेली बस सेवा पुढील कार्यकाळात बंद पडु नये यास्तव ठेकेदारसंस्थेस दरमहा रक्कम रू.५ लाख आर्थीक मदत देण्यात यावी. मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांची निविदा कागदपत्रे ग्राह्य धरण्यात येत असून त्याप्रमाणे तक्रारदार ॲडव्होकेट यांना कळविण्यात यावे.

मुदस्सर शेख :- चांगल्या स्थीतीतील बसेस चालविल्या पाहिजे,महिला व बालकांसाठी बस राखीव ठेवण्यात यावी.व पुढीच्या काळात नागरीकांच्या दृष्टीने आवश्यक असलेली बस सेवा बंद पडुनये या करीता रक्कम रू.५ लाख आर्थीक मदत ठेकेदार संस्थेस देण्यात यावी.ठेकेदार संस्थेने किमान १५ ते ३० बसेच दररोज चालविलया पाहिजे.या अटिवर विषय मंजूर करण्यात यावा. मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांची निविदा कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा या कामाची ई - निविदा क्र.१७५८ नुसार खाजगी अभिकर्ता संस्थेकडून BOO तत्वावर उपक्रम राबविणेबाबत मे.दिपाली ट्रान्सपोर्ट, अहमदनगर यांची निविदा कागदपत्रे ग्राह्य धरण्यात येत असून त्याप्रमाणे तक्रारदार ॲडव्होकेट यांना कळविण्यात यावे.मे दिपाली ट्रान्सपोर्ट यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती अंतीम झालेले स्वमित्वधन रू.२२००/-प्रति बस प्रति माह ग्राह्य धरणेस, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मा.महासभा ठराव क्र.१० दि.०५/०७/२०१४ नुसार खाजगीकरणातुन बस सेवा चालवितांना पुर्वानुभव पहाता पुढील कार्यकाळात नागरीकांच्या दृष्टीने आवश्यक असलेली बस सेवा बंद पडुनये यास्तव अभिकर्ता संस्थेस रक्कम रू.५,००,०००/- (रक्कम रू.५ लक्ष ) पर्यत दरमहा आर्थीक मदत देण्यात यावी. पुढील काळात बस सेवेस जादा तुट आल्यास त्याची नुकसान भरपाई देण्याबाबत स्थायी समितीस या बाबतचे अंतीम

अधिकार राहतील.जर ठेकेदाराने किमान १५ ते ३० सुस्थितीतील बसेस घेवून प्रतिदिन चालविल्यास आर्थीक मदत देण्यास ही सभा मान्यता देत आहे.महिला व शालेय विदयार्थी व विदयार्थिनींसाठी स्वतंत्र्य बस आरक्षित ठेवण्यात यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा या कामाची ई - निविदा क्र.१७५८ नुसार खाजगी अभिकर्ता संस्थेकडून BOO तत्वावर उपक्रम राबविणेबाबत मे.दिपाली ट्रान्सपोर्ट, अहमदनगर यांची निविदा कागदपत्रे ग्राह्य धरण्यात येत असून त्याप्रमाणे तक्रारदार ॲडव्होकेट यांना कळविण्यात यावे.मे दिपाली ट्रान्सपोर्ट यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती अंतीम झालेले स्वमित्वधन रू.२२००/-प्रति बस प्रति माह ग्राह्य धरणेस, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मा.महासभा ठराव क्र.१० दि.०५/०७/२०१४ नुसार खाजगीकरणातुन बस सेवा चालवितांना पुर्वानुभव पहाता पुढील कार्यकाळात नागरीकांच्या दृष्टीने आवश्यक असलेली बस सेवा बंद पडुनये यास्तव अभिकर्ता संस्थेस रक्कम रू.५,००,०००/- (रक्कम रू.५ लक्ष ) पर्यत दरमहा आर्थीक मदत देण्यात यावी. पुढील काळात बस सेवेस जादा तुट आल्यास त्याची नुकसान भरपाई देण्याबाबत स्थायी समितीस या बाबतचे अंतीम अधिकार राहतील.जर ठेकेदाराने किमान १५ ते ३० सुस्थितीतील बसेस घेवून प्रतिदिन चालविल्यास आर्थीक मदत देण्यास ही सभा मान्यता देत आहे.महिला व शालेय विदयार्थी व विदयार्थिनींसाठी स्वतंत्र्य बस आरक्षित ठेवण्यात यावी.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- २९ शनिवार दि.०४/०८/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेची आरोग्य मोटार व्हेईकल,फायर फायटर ,अतिक्रमण विभागाकडील जुन्या झालेल्या वाहनांची लिलावाव्दारे विक्री करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

**संदर्भ :-** १] मो.व्हे.ऑफिस रिपोर्ट दि.०६/०९/२०१४

२] उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,यांना वाहने निर्लेखित करणेबाबत.

३] उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,यांचेकडील वाहनांचे सरकारी किंमती आधारभुत काढले बाबत पत्र जा.क्र.१३०० दि.०३/०७/२०१८.

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सादर करणेत येते की,अहमदनगर महानगरपालिकेची आरोग्य विभाग ,मोटार व्हेईकल,पाणी पुरवठा विभागाकडे असणारी वाहने टाटा १६१३,ट्रॅक्टर,जीप,टाटा ९०९,ॲम्बिसिडर कार या प्रकारातील असून सदरची वाहने जुनी झालेली असून इंजिन कामे,गिअर बॉक्स,टायर टयुब,इले.डेन्टींग,पेंटीग ,बॉडी रिपेअर इत्यादी मोठ्या प्रमाणात खर्च असल्याने तसेच आर.टी.ओ नियमाप्रमाणे वाहने १० वर्षे जुनी झाल्याने ऑटोमोबाईल इंजि,मेकॅनिकल यांचे लेखी रिपोर्ट नुसार वाहने निर्लेखित करणे बाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालयास जुन्या वाहनांच्या सरकारी आधारभुत किंमती काढणेकामी एकूण ६ स्मरणपत्रे देण्यात आली असता त्यांचेकडील सरकारी आधारभुत किंमती काढणेकामी एकूण ६ स्मरणपत्रे देण्यात आली असता त्यांचेकडील पत्र जा.क्र.१३०० दि.०३/०७/२०१८ अन्वये खालील प्रमाणे किंमती काढून मिळालेल्या आहेत.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | | | अंदाजीत किंमत रू |
|---|---|---|---|---|
| १ | एम.एच.१६ एन १७ | महेंद्र ट्रॅक्टर | ०७/०१/१९९९ | ४५०००/- |
| २ | एम.एच.१६ एन ५७ | महेंद्र ट्रॅक्टर | ०५/१०/२००० | ४८०००/- |
| ३ | एम.एच.१६ एन २८ | महेंद्र ट्रॅक्टर | ०७०१/१९९९ | ४२०००/- |
| ४ | एम.एच.१६ सी ८७८ | महेंद्र ट्रॅक्टर | २/११/१९९५ | ३५०००/- |
| ५ | एम.एच.१६ एन ४७ | मार्शल जीप | ०५/०८/१९९९ | ३५०००/- |
| ६ | एम.एच.१६ टी ३४ | टाटा १६१३ | १३/०७/२००० | १,१०,०००/- |
| ७ | एम.एच.१६ टी१२ | टाटा १६१३ | १३/०५/१९९९ | १,०५,०००/- |
| ८ | एम.एच.१६ टी १४ | टाटा ९०९ | २८/०७/१९९९ | ७५०००/- |
| ९ | एम.एच.१६ एन २०१ | ॲम्बेसिडर कार | २३/१२/२००४ | ४०,०००/- |
| १० | एम.एच.१६ एन २११ | ॲम्बेसिडर कार | २१/०३/२००५ | ४५,०००/- |

उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने वाहनांचे काढलेल्या सरकारी आधारभूत किंमतीच्या अनुषंगाने वाहनांचा लिलाव करणेकरीता ई - निविदा प्रसिध्द करणेस,खर्चास व कामास मंजूरीस्तव रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मेकॅनिकल इंजी.यांचा अभिप्राय की,अहवालात नमुद वाहने निर्लेखित करणे कामी मा.उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरण,अ.नगर यांचेशी पत्रव्यवहार करणेत आला असता त्यांच्याकडून संदर्भिय पत्र क्र.३ प्राप्त झाले असून यात आधारभूत किंमती दिलेल्या आहेत.

करिता प्राप्त आधारभूत किंमतीच्या आधार घेवून नमूद वाहनांचा ई - निविदा पध्दतीने लिलाव करणेकामी मा.स्थायी समिती मंजूरी घेणे योग्य.मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मेकॅनिकल इंजी व मा.मुलेअ यांच्या प्रस्तावानुसार अ व ब प्रमाणे कार्यवाही करणे उचित राहिल.

वाहने निर्लेखित करण्याबाबत शासनाचे मार्गदर्शक शासन निर्णय/ शासकीय परिपत्रक नस्ती सोबत सादर करून फेर सादर करावे.

मा.फेरसादर,

प्रस्तावात नमुद वाहने शासन नियमाप्रमाणे १० वर्ष जुनी झालेली आहेत,वाहनांची वेगवेगळया विभागात ब-याच काळापर्यंत कार्यरत होती.वाहनांची झीज झालेली असून इंजिन कामे,बॉडी कामे,इलेक्ट्रीक काम,टायर टयुब इत्यादी प्रमाणे खर्च करूनही वाहने चालू शकणार जास्त काळ नसल्याने मा.शासन निर्णय क्र.२०१३/प्र.क्र.३०//२०१३ विनियम भाग -२ १७ एप्रिल २०१५ मध्ये १० वर्षे जुनी झालेली वाहने निर्लेखित करणे बाबत नमूद आहे.तसेच मा.उपप्रादेशीक कार्यालयाकडून सदची वाने निर्लेखित करणे कामी मंजूरी व सरकारी किंमती काढून घेणेत आलेल्या आहेत.प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरी करीता देणे कामी मान्यतेस्तव सादर.

यावर मेकॅ.इंजी.यांचा अभिप्राय की,फेरसादर

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,वाहन दुरूस्त करून यापुढे उपयोगात आणणे आर्थिक दृष्या किफायतशीर राहणार नाही.याबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे पत्र नस्ती सोबत दिसून येत नाही.तरी याबाबत विभागाने उचित निर्णय घेणे योग्य राहिल.

यावर मेकॅ.इंजी.यांचा अभिप्राय की,ऑफिस रिपोर्ट नमुद वाहने निर्लेखित करणेकामी,मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी ,अ.नगर यांची संदर्भीय पत्र ३३ अन्वये आधारभूत किंमती काढून दिलेल्या आहेत.करिता नमुद वाहने लिलाव करणेकामी मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे योग्य.मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, १० वर्षा पेक्षा जुनी असलेल्या वाहनांची उपप्रादेशिक परिवहन कार्यालया कडून अंदाजित किंमत ठरविण्यात आलेली आहे.परंतु मु.ले.प.यांच्या अभिप्रायानुसार पुर्तता करून फेर सादर करावे.

यावर मेकॅ.इंजी.यांचा अभिप्राय की, मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी ,अ.नगर यांचे संदर्भिय पत्र क्र.३ प्राप्त असून यात नमुद वाहने निर्लेखित करणेबाबतची बाब नमूद असून त्याची अंदाजित किंमती ही करिता मूळ अहवालानुसार मंजूरीस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्ष यांचा अभिप्राय की,विभागाने खुलासा केल्याप्रमाणे अ व ब प्रमाणे कार्यवाही करणे उचित राहिल.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्रायानुसार अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर अति.आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या फेर अहवालामधील पान क्र.T १ ते T-०९ प्रमाणे ई - निविदा कामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेची आरोग्य मोटार व्हेईकल,फायर फायटर ,अतिक्रमण विभागाकडील जुन्या झालेल्या वाहनांची लिलावाव्दारे विक्री करणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आर.टी.ओ.ने वाहनांच्या किंमती ठरवुन दिल्या आहेत.

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम:-आर.टी.ओ.कार्यालयाकडून वाहनांच्या आधारभूत किमती ठरवून दिलेल्या आहेत.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- या गाडयांचा लिलाव झाल्यानंतर तर कामाचा खोळंबा होणार नाही का?

मा.सभापती साहेब :- या गाडयां विकल्या गेल्या नंतर आपण निविन गाडया घेणार का?

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- तसा काहीही प्रस्ताव आलेला नाही.

मा.सभापती साहेब :- ज्या विभागास आवश्यकता असेल त्या विभागास नविन वाहने घ्या.

मा.श्री.मुदस्सर शेख :- अतिक्रमण विभागाच्या वाहनाचा या मध्ये समावेश आहे.या विभागास नविन वाहन तात्काळ घ्यावे लागेल.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- अतिक्रमण विभागास दोन वाहनांची आवश्यकता असून सन्माननीय सदस्यांनी सुचवल्या प्रमाणे नविन दोन वाहनांस मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेची आरोग्य मोटार व्हेईकल,फायर फायटर ,अतिक्रमण विभागाकडील जुन्या झालेल्या वाहनांची लिलावाव्दारे विक्री करणेबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने वाहनांचे काढलेल्या सरकारी आधारभूत किंमतीच्या अनुषंगाने वाहनांचा लिलाव करणेकरीता ई - निविदा प्रसिध्द करणेस,खर्चास व कामास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेची आरोग्य मोटार व्हेईकल,फायर फायटर ,अतिक्रमण विभागाकडील जुन्या झालेल्या वाहनांची लिलावाव्दारे विक्री करणेबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने वाहनांचे काढलेल्या सरकारी आधारभूत किंमतीच्या अनुषंगाने वाहनांचा लिलाव करणेकरीता ई - निविदा प्रसिध्द करणेस,खर्चास व कामास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळसाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- ३० शनिवार दि.०४/०८/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह ) कामी ई - निविदा क्र.१५६२ करिता मे.दिपाली ट्रन्सपोर्ट यांनी सादर केलेली निविदा दरांची निविदा मान्यतेस्तव ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग

**संदर्भ :-** १] ई - निविदा क्र.१५६२

२] दि.१९/०५/२०१८ ची मा.छाननी समिती.

३] मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांचे दि.०३/०७/२०१८ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत विनंती रिपोर्ट सादर की,विषयांकीत कामाची ई - निविदा क्र.१५६२ प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडला असता त्यास खालीलप्रमाणे तीन निविदाधारक प्राप्त झाली.

ई निविदा क्र.१५६२ १] मे.दिपाली ट्रान्सपोर्ट, अहमदनगर

२] मे.गाडे ट्रान्सपोर्ट, अहमदनगर

३] शंकर माथाडी हमाल कामगार मजूर संस्था मर्या,अहमदनगर

तीनही निविदाधाकांची तांत्रिक कागदपत्रांची पडपाळणी केली असता सर्व कागदपत्रे यथायोग्य आढळून आल्याने दि.१२/०१/२०१८ रोजी मा.छाननी समितीच्या शिफारशीने आर्थिक लिफाफा उघडण्यात आला.त्यानुसार सर्वात कमीचे निविदाधारक मे.दिपाली ट्रन्सपोर्ट यांचा आर्थीक दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | प्रति दिन भाडे रूपये | | प्रति कि.मी.भाडे रूपये लिटरमध्ये | |
|---|---|---|---|---|---|
| | | ७००० लि. | १००००लि. | ७००० लि. | १००००लि. |
| १ | मे.दिपाली ट्रन्सपोर्ट | १४२५/- | १९२५/- | २०.२५ | २२.६५ |

त्या अनुषंगाने निविदाधारक मे.दिपाली ट्रन्सपोर्ट यांचे दर सर्वात कमीचे असल्याने त्यांना दि.१४/०५/२०१८ रोजी वाटाघाटीसाठी मा.छाननी समिती समोर बोलाविले असता त्यांचेशी चर्चा करून सदर बैठकीमध्ये मा.छाननी समितीने खालीलप्रमाणे नमूद दरांची शिफारस केली आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | प्रति दिन भाडे रूपये | | प्रति कि.मी.भाडे रूपये लिटरमध्ये | |
|---|---|---|---|---|---|
| | | ७००० लि. | १००००लि. | ७००० लि. | १००००लि. |
| १ | मे.दिपाली ट्रन्सपोर्ट | १२५०/- | १८२५/- | १८.०० | २२.०० |

त्यानुसार मा.छाननी समितीने दिलेल्या दर मान्य असलेले बाबत मे.दिपाली ट्रन्सपोर्ट यांनी संदर्भिय पत्र क्र.३ नुसार इकडेस कळविले आहे.

करिता अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये पाणी वाटप करणेसाठी ई - निविदा क्र.१५६२ करिता मे.दिपाली ट्रन्सपोर्ट यांनी सादर केलेली निविदा व वाटाघाटी अंती अंतीम झालेल्या दारची निविदा मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता यांवा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता व पाणी पुरवठा विभाग प्रमुख व मा.मुख्यलेखाधिकारी यांच्या प्रस्तावानुसार अहवाल मा.स्थायी समिती कडे सादर करणे योग्य राहिल.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,अ नुसार मान्यतेस्तव सादर

यावर अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवाला प्रमाणे मान्यतेस्तव सादर

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह ) कामी ई - निविदा क्र.१५६२ करिता मे.दिपाली ट्रन्सपोर्ट यांनी सादर केलेली निविदा दरांची निविदा मान्यतेस्तव ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सभपती साहेब :- सध्या किती टॅकर शहरात चालू आहेत.

मा.श्री.विजय गव्हाळे :- टॅकर ची माहिती दया.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- एकुण १५ टॅकर शहरामध्ये चालू आहेत.सारसनगर येथे -४,कल्याण रोड येथे -४, केडगांव येथे ३ टॅकर आहेत.

मा.श्री.विजय गव्हाळे :- दहा - दहा दिवसांनी पाणी पुरवठा करण्यात येतो,टॅकर करीता फोन केल्यास उडवाउडवीची उत्तरे दिली जातात.ड्रायव्हर व्यवस्थीत बोलत नाही.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- टॅकर ने पाणी पुरवठा करण्यात चे शेडयुल तयार करा.

मा.श्री.विजय गव्हाळे :- टॅकरवर कुणाचेही नियंत्रण नाही.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- वसंतटेकडी येथील कामगार या टॅकरचे नियंतत्रण करतात.

मा.श्री.संजय लोंढे :- ड्रयव्हर त्यांच्या सोईने पाणी पुरवठा करतात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नगरशहर टॅकर मुक्त केव्हा होणार,फेज -२ योजना चालू आहे,अमृत योजना चालू आहे.या योजना पुर्ण झाल्यास नगर शहर टॅकर मुक्त होईल.या योजना लवकरात लवकर पुर्ण करण्यात याव्यात.टॅकरवरील जी.पी.एस.सिस्टीम चालू आहे का?

अतिरीक्त आयुक्त साहेब :- जी.पी.एस.सिस्टम व्दारे कॉम्प्युटरला दिसले पाहिजे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह ) ई - निविदा क्र.१५६२ करिता मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांनी सादर केलेली निविदा व वाटाघाटी अंती अंतीम झालेल्या दाराच्या निविदेस कार्यारंभ आदेश दिल्यानंतर पुढील एक वर्षाच्या कालावधी करीता मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेस महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह ) ई - निविदा क्र.१५६२ करिता मे.दिपाली ट्रान्सपोर्ट यांनी सादर केलेली निविदा व वाटाघाटी अंती अंतीम झालेल्या दाराच्या निविदेस व सदरच्या संस्थेचा कार्यकाळ हा कार्यारंभ आदेश दिल्यापासुन पुढील एक वर्षा करीता धरण्यास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळसाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- ३१ शनिवार दि.०४/०८/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागाकरीता महानगरपालिकेने खरेदी केलेल्या २ नग टाटा -४०७ चेसीवर हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणेबाबत मे.मणियार ॲण्ड कंपनी यांचे निविदा दर मान्यतेस्तव ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

**संदर्भ :-** मो.व्हे.जा.क्र.४१ दि.१४/०६/२०१८ चे पत्र मणियार ॲण्ड कंपनी यांचे वाटाघाटी केले बाबत पत्र दि.१५/०६/२०१८.

उपरोक्त संदर्भ संदर्भ व विषयान्वये विनंती पुर्वक सादर करण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिकेने दान नग टाटा- ४०७ वाहनांवर हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणेबाबत निविदा क्र.१६९६ प्रसिध्द करणेत आलेली होती.सदरची निविदा एकूण पाच वेळेस प्रसिध्द केली असून शुध्दीपत्रक क्र.४ मुदतवाढीमध्ये मणियार ॲण्ड कंपनी यांची एकच निविदा प्राप्त झालेली आहे.सदर कामासाठी प्रतिनग रूपये ८,२०,०००/- याप्रमाणे त्यांनी दर दिलेले असल्याने दरासंबंधी निगोसिएशन करणे बाबत मो.व्हे.जा.क्र.४१ दि.१४/०६/२०१८ अन्वये पत्र देण्यात येवून दि.१९/०६/२०१८रोजी मा.उपायुक्त यांचे दालनात वाटाघाटी बाबत चर्चा झालेली असून सदर वाटाघाटी बाबत चर्चा झालेली असून वाटाघाटी चर्चा करणेकामी मा.उपायुक्त,मुख्यलेखाधिकारी,मुख्यलेखापरिक्षक,मेकॅनिकल इंजिनीअर,तसेच मणियार ॲण्ड कंपनी यांचे प्रतिनिधी समक्ष उपस्थित होते.

सदर दि.१९/०६/२०१८ चे चर्चेनुसार हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून देणेकामी वाटाघाटी केलेनुसार मणियार ॲण्ड कंपनी यांनी प्रति मायड्रो.प्लॅटफॉर्म करीता रूपये ८,१५,०००/-इतकी रक्कम ग्राह्य धरणे बाबत पत्र सादर केले आहे.अहमदनगर महानगरपालिकेने हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणेकामी एकूण ५ वेळेस निविदा प्रसिध्द केलेल्या आहेत.तसेच याकरिता आवश्यक टाटा ४०७ चेसी २ नग यापूर्वीच खरेदी करून ठेवलेल्या आहेत व त्यावर हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणे आवश्यक आहे.तरी वाटाघाटीअंतर्गत कमी केलेल्या दरानुसार हायड्रो.प्लॅटफॉम बनवून घेणे उचीत होईल,असे वाटते तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मेकॅनिकल इंजि.यांचा अभिप्राय की,उक्त विषयी कमीचे निविदाकार मे.मणियार ॲण्ड कंपनी ,अहमदाबाद यांचे प्राप्त दर अवाजवी असल्याने त्यांना दर कमी करणेच्या दृष्टीने वाटाघाटी साठी बोलविण्यात आले होते.वाटाघाटी अंती प्रप्त दर रू.८,१५,०००/- प्राप्त नग हे जादाचेच आहेत.

परंतु उक्त विषयीच्या निविदेस मिळणारा अल्प प्रतिसाद या कामी टाटा ४०७ एस.एफ.सी.च्या दोन नग चेसीस ची करण्यात आलेली खरेदी ,कामाची निकड या बाबींचा विचारात घेता,वाटाघाटी नंतरचा प्राप्त दराबाबत उचित निर्णय होणे गरजेचे वाटते.

करिता प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर करणे उचित राहिल.मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मेकॅनिकल इंजी यांच्या प्रस्तावानुसार वाटाघाटी नंतर च्या प्राप्त दरा बाबत निर्णसासाठी मा.स्थायी समिती च्या समोर सादर करणे उचित राहील.

नस्तीमध्ये पेजिंग अपुर्ण आहे.मनियार यांचे दि.१५/०६/२०१८च्या पत्रात रू.५०००/- कमी करून रू.८,१५,०००/- अंतीम दर देण्यात आले आहे.वाटाघाटी दि.१९/०६/२०१८ नंतरचे दर नस्ती सोबत दिसून येत नाही.वाटाघाटी नंतर मा.स्थायी समिती समोर विचारार्थ ठेवणे योग्य राहिल.

यावर मेकॅनिकल इंजि.यांचा अभिप्राय की, पेजींग पुर्ण झालेले आहे.वाटाघाटी बाबतचे मे.मनियार यांचे पत्र नस्ती मध्ये दाखल आहेच.करिता अहवालानुसार मान्यतेस्तव.

यावर मा.उपायुकत यांचा अभिप्राय की,मुलेप यांच्या अभिप्रायानुसार सदर चा विषय मा.स्थायी समिती समोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुकत यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवाला मधिल पान क्र.टि.३८ ते टि.४० प्रमाणे वाटाघाटीनंतर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेसाठी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागाकरीता महानगरपालिकेने खरेदी केलेल्या २ नग टाटा -४०७ चेसीवर हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणेबाबत मे.मणियार ॲण्ड कंपनी यांचे निविदा दर मान्यतेस्तव ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबत सविस्तर माहिती विभाग प्रमुख यांनी दयावी.

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- मणियार ॲण्ड कंपनी यांची एकच निविदा प्राप्त झालेली आहे.सदर कामासाठी प्रतिनग रूपये ८,२०,०००/- याप्रमाणे त्यांनी दर दिलेले असल्याने दरासंबंधी दि.१९/०६/२०१८रोजी मा.उपायुक्त यांचे दालनात वाटाघाटी मध्ये मणियार ॲण्ड कंपनी यांनी प्रति मायड्रो.प्लॅटफॉर्म करीता रूपये ८,१५,०००/-इतकी रक्कम ग्राह्य धरणे बाबत पत्र सादर केले आहे.अहमदनगर महानगरपालिकेने हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणेकामी एकूण ५ वेळेस निविदा प्रसिध्द केलेल्या आहेत.तसेच याकरिता आवश्यक टाटा ४०७ चेसी २ नग यापूर्वीच खरेदी करून ठेवलेल्या आहेत व त्यावर हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणे आवश्यक आहे.तरी वाटाघाटीअंतर्गत कमी केलेल्या दरानुसार हायड्रो.प्लॅटफॉम बनवून घेणे उचीत होईल,असे वाटते तथापी आदेशार्थ सविनय सादर.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- छाननी समितीने केलेल्या शिफारशी नुसार हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून देणेकामी वाटाघाटी केलेनुसार मणियार ॲण्ड कंपनी यांनी प्रति मायड्रो.प्लॅटफॉर्म करीता रूपये ८,१५,०००/-इतकी रक्कम ग्राह्य धरून टाटा ४०७ चेसी २ नग वर हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणे बाबच्या ऑफिस रिपोर्टास हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागाकरीता महानगरपालिकेने खरेदी केलेल्या २ नग टाटा - ४०७ चेसीवर हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून घेणेबाबत छाननी समितीने केलेल्या शिफारशी नुसार हायड्रो.प्लॅटफॉर्म बनवून देणेकामी वाटाघाटी केलेनुसार मणियार अ‍ॅण्ड कंपनी यांनी प्रति मायड्रो.प्लॅटफॉर्म करीता रूपये ८,१५,०००/-इतकी रक्कम ग्राह्य धरून बाबतच्या ऑफिस रिपोर्टास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- ३२ शनिवार दि.०४/०८/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये केंद्र सरकारच्या मालकीचे रेल्वेस्टेशन मिळकतीचे मालमत्ता कर व इतर कर वॉर्ड क्र.२४ बिल नं.५०८ वरील इतर कर रद्द करून सेवा कराचे बील देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४,बुरूडगांव रोड

**संदर्भ :-** मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांनी दि.११/७/२०१८ रोजी वसुली आढावा बैठकीत दिलेल्या आदोशान्वये.

अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये वॉर्ड नं.२४ बिल नं.५०८ केंद्र सरकारचे मालकीचे रेल्वेस्थानक आहे.सदर मिळकतीस सन २०१८/२०१९ अखेर एकुण थकबाकी रू.१८२८६८२४/- + शास्ती आहे.सदर मिळकतीस सन १९९५/१९९६ या वर्षामध्ये आकारणी केलेली आहे.सदरची आकारणी परीपत्रक ४(७) (P) ६५ दि.२९/३/१९६७ अन्वये ज्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून केंद्रसरकारच्या मालमत्ता संपुर्ण सोयी सुविधा पुरवली जातात.त्यांचे कडून मालमत्ता कराचे रक्कमेच्या ७५% रक्कम सेवाभार म्हणून वसुल करण्याची निर्देश दिले तर ज्या ठिकाणी काही सेवा स्थानिक प्रशासनाकडून दिल्या जातात त्या ठिकाणी ५०% व कोणत्याही सोयी सुविधा दिल्याजात नसतील तेथे ३३.३३ सेवा भार वसुल करण्यास मुभा देण्यात आलेली आहे.तसेच पाणी पुरवठयाची सेवा पुरविलेली आहे.

सदर मिळकतीवरील थकबाकी रू.१८२८६८२४/- थकबाकी असून सदरची थकबाकी रद्द करून सदरच्या मिळकतीस सेवाकराप्रमाणे सन सन १९९५/१९९६ ते २००४/२००५ अखेर रू.१७७४३५ प्रमाणे रू.१९६५८८०/- असे सन १९९५/१९९६ ते २०१८/२०१९ पर्यतचे दुरूस्ती नुसार बील देवून एकुण रू.३७४०२३०/- वसुल करणेस हरकत नाही.

सबब सदर रक्कम रू.१४५४६५९४/-ही रक्कम महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार वसुल न होणारी असल्याने निर्लेखीत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रभाग अधिकारी ,प्र.स.कार्या.४ यांचा अहवाल असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,उक्त प्रस्तावात नमुद केल्यानुसार सेवाकराची आकारणी बाबत वर्षनिहाय आकडेवारी मा.मुलेप यांच्या कडुन तपासणी करून घेणे उचित होईल.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ नुसार मुलेप यांचा अभिप्राय घेवून सादर करा.

यावर मा.मुख्यलेपापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्र.सहाय्यक यांनी अभिप्रायात नमुद केल्याप्रमाणे मुख्यलेखापरिक्षकास कशाच्या आधारे तपासणी करावयाची याचे आदेश मुख्यलेखापरिक्ष देता येईल का? या बाबत स्वयंस्पष्ट अधिनियमातील तरतुदीसह प्र.सहाय्यक आयुक्त यांनी फेरसादर करावे.

प्र.सहा.आयुक्त यांनी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार वर्ष निहाय कर योग्य मुल्य यांची खात्री करून त्याप्रमाणे परिगणना करूनच मुख्यलेखापरिक्ष यांचेकडे अभिप्रायासाठी सादर करण्याची दक्षता घ्यावी.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर,प्रस्तुत प्रकरणी मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी दिनांक २४/७/२०१८ नुसार आदेशीत केलेप्रमाणे वर्षनिहाय तक्ता पान नं.११ वर नमुद आहे.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रभाग अधिकारी यांनी दि.२५/७/१८ रोजी सादर केल्यानुसार उचित कार्यवाहीस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मुख्यलेखापरिक्षक यांच्या दि.२४/७/१८ च्या टिपणीतील मुद्दा क्र.१ ची त्रुटीपुर्तता अ नुसार पान क्र.११ वर सादर केली आहे.

मुख्यलेखापरिक्षक यांच्या मुद्दा क्र.३ नुसार,करयोग्य मुल्य यानुसार तसेच पान क्र.३५ वरील चीफ सेक्रेटरी ,भारत सरकार,शहरी विकास मंत्रालय,यांचे दि.२५/७/२०१३ चे पत्रात नमूद मिनिस्टी ऑफ फायनान्स डीपार्टमेंट चे परिपत्रक दि.२९/३/१९६७ पान क्र.३६ च्या तरतुदीनुसार रेल्वेस देय सेवा कराची परिगणना सादर केली आहे.

तरी उर्वरित रक्कम निर्लेखित करणेस मा.स्थायी समितीकडे ठेवणेस,उचित होईल.

तरी सदर परिगणना ,मुख्यलेखापरिक्षक यांनी तपासणी करून अभिप्राय दयावा ही विनंती.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,सदर कर आकारणी बाबत रेल्वेस्टेशन मिळकतीचे मालमत्ता कर व इतर कर रद्द करून सेवा कराच्या बिलाबाबत प्रस्ताव दि.१२/७/१८ रोजी सादर केला असून सदर नस्तीचे अवलोकन केले असता पृ.क्र.१७ वर मा.आयुक्त यांनी दि.१७/३/१२ च्या शेरांकनानुसार टिपणी मंजूर करून सदरची रक्कम रू.३२,४१,७४१/-इतकी वसुल न होणारी रक्कम मनपा अधिनियमातील कलम १५२ नुसार निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीपुढे प्रस्ताव देणेबाबत मान्यता दिलेली असल्याचे दिसून येते.याबाबत पृ.क्र.१५ प्र.स.कार्या.४ ,बुरूडगांव जा.क्र.४०९ दि.२९/३/१२ च्या मंजूर केलेल्या व स्थयी समिती च्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले असल्याने पुन्हा मंजूरीची आवश्यकता वाटत नाही.तरी विभागाने सदर मंजूर टिपणी प्रमाणेच उचित निर्णय घेणे योग्य राहिल.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,रेल्वे स्टेशन अहमदनगर यांचे सेवा कर आकारणी बाबत माननिय मुख्यलेखाधिकारी यांचे वरिल प्रमाणे शेरांकनानुसार सेवा कर आकारणी बाबत ठराव सन ११/१२ मध्ये झाला किंवा कसे या बाबत अभिप्राय इकडेस देणेस विनंतीस्तव सादर.

यावर नगरसचिव यांचा अभिप्राय की,इकडील अभिलेखाची पडताळणी केली असता,सदर विषयाबाबत निर्लेखित करणे बाबत चा ठराव पारित झाल्याचे दिसून येत नाही.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,रेल्वे स्टेशन अ.नगर,यांचे सेवाकर आकारणीबाबत उर्वरित रक्कम रक्कम निर्लेखित करण्यासाठी म.न.पा.अधिनियम कलम १५२ क नुसार स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणेस उचित होईल.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये केंद्र सरकारच्या मालकीचे रेल्वेस्टेशन मिळकतीचे मालमत्ता कर व इतर कर वॉर्ड क्र.२४ बिल नं.५०८ वरील इतर कर रद्द करून सेवा कराचे बील देणे बाबतचा ऑफिस रिपोर्टआहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- रेल्वे अधिका-यांचे पत्र आहे का? म.न.पा.अधिनियम कलम १५२ क नुसार का वसुल होवू शकत नाही?

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- जेव्हा महानगरपालिकेस लाईट बिल भरण्यास उशिर झाल्यास तर विज कनेक्शन तोडतात.मग आपण एवढे पैसे कशासाठी माफ करायचे?

मा.श्री.विजय गव्हाळे :- आपण त्यांना सहजासहजी इतकी मोठी रक्कम कशासाठी माफ करायची?

अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- म.न.पा.अधिनियम कलम १५२ क नुसार सेंट्रल गर्व्ह.च्या प्रॉपर्टी ला १००% र वसुल करता येत नाही.त्या करता सेवा कर आहे.तो आपण वसुल करू शकतो.पालिकेने केलेल्या चुकीच्या कर आकारणी मुळे ही डीमांड वाढत आहे.त्यांचे म्हणणे आहे की,नियमानुसार

आम्हाला कर आकारणी करून दया.आम्ही पैसे भरण्यास तयार आहोत.त्यांना नियमानुसार देय येते तेवढी आकारणी करायला पाहिजे.

मा.सभापती साहेब :- म.न.पा.अधिनियम कलम १५२ क काय आहे? कर आकारणी चुकीची कशी झाली?

मा.श्री.विजय गव्हाळे :- वसुल होणार नाही असे कसे म्हणता येईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- पत्र काय आहे,पत्राचे वाचन करण्यात यावे.

मा.उपायुक्त श्री.पठारे :- तत्कालीन नगरपालिकेच्या चिफ ऑफिसर यांना पत्र लिहीले आहे,कि आम्ही नगरपालिकेची सुविधा घेत नाही.

अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- सेंट्रल गर्व्हमेंटला प्रॉपटी टॅक्सच बिल देता येत नाही.तर सेवाकराचे ७५% प्रमाणे बिल देता येते.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये केंद्र सरकारच्या मालकीचे रेल्वेस्टेशन मिळकतीचे मालमत्ता कर व इतर कर वॉर्ड क्र.२४ बिल नं.५०८ वरील थकबाकी रू.१,८२,८६,८२४/- रक्कम महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार वसुल न होणारी असल्याने निर्लेखीत करण्यास व सदरच्या मिळकतीस सेवा करा प्रमाणे सन १९९५/१९९६ ते २०१८/२०१९ पर्यतचे ७५% प्रमाणे दुरूस्ती नुसार बील देण्यात यावे व महानगरपालिके मार्फत देण्यात येणा-या सुविधा शक्य असल्यास देण्यात याव्यात.महानगरपालिकेस सेवा देणे शक्य नसल्सास ५०% प्रमाणे दुरूस्ती बील देण्यास मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये केंद्र सरकारच्या मालकीचे रेल्वेस्टेशन मिळकतीचे मालमत्ता कर व इतर कर वॉर्ड क्र.२४ बिल नं.५०८ वरील थकबाकी रू.१,८२,८६,८२४/- रक्कम महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार वसुल न होणारी असल्याने निर्लेखीत करण्यास व सदरच्या मिळकतीस सेवा करा प्रमाणे सन १९९५/१९९६ ते २०१८/२०१९ पर्यतचे ७५% प्रमाणे दुरूस्ती नुसार बील देण्यात यावे व महानगरपालिके मार्फत देण्यात येणा-या सुविधा शक्य असल्यास देण्यात याव्यात.महानगरपालिकेस सेवा देणे शक्य नसल्सास ५०% प्रमाणे दुरूस्ती बील देण्यास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- ३३ शनिवार दि.०४/०८/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक व विजतंत्री यापदांवर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** १) संदिप प्रभाकर पुंड व इतर यांचा दिनांक १६/०२/२०१८ रोजीचा अर्ज.
२) पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा योजना ६८ दि. १६/०४/२०१८ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये की, संदिप प्रभाकर पुंड व इतर यांनी दि. १६/०२/२०१८ रोजी विनंती अर्ज देवुन दरमहा मानधनामध्ये वाढ करणे बाबत विनंती केलेली असुन सदर अर्जाच्या अनुषंगाने इकडील जा.क्र. आस्था. ४५५५ दि. २७/०३/२०१८ अन्वये पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांना पत्र देवुन मानधनवाढ विषयी संदर्भात स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करणे बाबत सुचित केलेले होते.

त्यानुषंगाने अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील शहर पाणी पुरवठा योजना ६८ दि. १६/०४/२०१८ अन्वयेच्या अहवालपत्रामध्ये " अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेसह शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील महत्वाची तांत्रिक रिक्त झालेली पदे व त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती विचारात घेवुन पाणी पुरवठा विभागाकरीता मोठ्या प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने करारा नुसार नमुद तांत्रिक हुद्दयाप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पदांवर नमुद कर्मचा-यांची मागणी विचारात घेता महानगरपालिकेस शक्य असल्यास पुर्वीच्या मानधनात रु. १५००/- ते २०००/- इतके मानधन वाढ करण्यास हरकत नाही. नियमानुसार योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर. " असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

यापुर्वी पाणी पुरवठा विभाग यांचेकडील वेळोवेळी अहवालाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागाकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक व विजतंत्री यापदांसाठी अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर सहा महिन्या करीता करारबध्द नियुक्तीसाठी थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या मा. निवड समिती मार्फत मुलाखती घेवुन उमेदवारांची निवड करुन भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली असुन त्यामध्ये तात्पुरत्या स्वरुपात सदर पदांस रु. ९,०००/- इतके मानधन दर्शविण्यात आलेले होते.

सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभाग यांचेकडील प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन वेळोवेळी सहा - सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक व विजतंत्री यापदांवर संबधितांची रु. ९,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्त्यांबाबत कार्यवाही करण्यात येत आहेत.

वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील पाणी पुरवठा विभाग प्रमुख त्यांचे कडील जा. क्र. ६८ दिनांक १६/४/२०१८ अन्वयेच्या अहवालामध्ये नमुद केल्या नुसार पाणी पुरवठा विभागाकरीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक व विजतंत्री यापदांवर नियुक्ती करीता रु. १५००/- ते २०००/- या दरम्यान दरमहा मानधनामध्ये वाढ करुन मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्त्या बाबत कार्यवाही करणेस झाल्यास सदरचा मानधनवाढी बाबतचा विषय सद्यस्थितीमधील आर्थिक

परिस्थिती व धोरणात्मक स्वरुपाची बाब असल्याने प्रसुत प्रकरणी मा. स्थायी समितीची पुर्व मान्यता घेणे उचित होईल. त्यानुषंगाने दरमहा मानधनवाढी बाबतचा तपशिल खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अं. नं. | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | विभाग | सध्याचे दरमहा मानधन देण्यात रक्कम रु. | प्रस्तावित दरमहा मानधनामध्ये वाढ रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | पंपचालक व विजतंत्री | पाणी पुरवठा | ९,०००/- | १,५००/- ते २,०००/- या दरम्यान |

तरी उपरोक्त वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील पाणी पुरवठा विभाग त्यांचेकडील जा. क्र. ६८ दिनांक १६/४/२०१८ अन्वयेच्या अहवालामध्ये नमुद केल्या नुसार त्यानुषंगाने पाणी पुरवठा विभागाकरीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक व विजतंत्री यापदांवरील मानधनामध्ये रु. १५००/- ते २०००/- या दरम्यान दरमहा मानधनामध्ये वाढ निश्चित निश्चित करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणे बाबत प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहा.आयुक्त,आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मुलेअ/मुलेप

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे कार्यवाही होणेस सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ व ब नुसार निर्णयास्तव

यावर उपायुकत (सा) यांची स्वाक्षरी

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,महानगरपालिकेवर दर महिन्याला किती बोजा वाढणार?

यावर सहा.आयुक्त,आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त विषयान्वये की,सद्यस्थितीमध्ये जा.क्र.आस्था .करारबध्द नेमणूक ६४९ दि.अन्वये १. संदिप प्रभाकर पुंड २.मनिष कैलास सोनवणे ३.सागर दिलीप जाधव४.गणेश बाबाजी शिंदे ५.गहिनीनाथ अंबादासा मेने यांची पाणी पुरवठा विभागामध्ये करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.०७/०२/२०१८पासुन सहा महिन्याकरीता दरमहा रू.९०००/- या दरमहा मानधनावर पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने दरमहा मानधनामध्ये रू.१५००/- ते रू.२०००/- याप्रमाणे वाढ करणे बाबत निर्णय झाल्यास रू.७५००/- किंवा १००००/- इतका दरमहा खर्चामध्ये वाढ निर्माण होईल.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,रू.१५०० दरमहा वाढ केल्यास रू.७५००/- दरमहा महानगरपालिकेवर बोजा पडेल व रू.२०००/- दरमहा वाढ केल्यास रू.१००००/- दरमहा महानगरपालिकेवर बोजा पडेल.मानधन वाढी बाबत चा प्रस्ताव स्थायी समिती कडे निर्णयासाठी पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक व विजतंत्री यापदांवर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.
मा.श्री.बासाहेब बोराटे :- मानधनामध्ये किती वाढ करायची .
आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- रक्कम रूपये १५००/- ते २०००/- वाढ करणे बाबत प्रस्ताव आहे.
मा.श्री.मुदस्सर शेख :- रक्कम रूपये २०००/- ने वाढ करून ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.
मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- रू.२०००/- ने वाढ करण्यात यावी.
मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेसह शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील महत्वाची तांत्रिक रिक्त झालेली पदे व त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती विचारात घेवुन पाणी पुरवठा विभागाकरीता मोठ्या प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने,नमुद कर्मचा-यांची मागणी विचारात घेता,पंपचालक व विजतंत्री यापदांवरील मानधनामध्ये रू. २०००/- दरमहा वाढ करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेसह शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील महत्वाची तांत्रिक रिक्त झालेली पदे व त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती विचारात घेवुन पाणी पुरवठा विभागाकरीता मोठ्या प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कर्मचा-यांची मागणी विचारात घेता,पंपचालक व विजतंत्री यापदांवरील मानधनामध्ये रू. २०००/- दरमहा वाढ करण्यास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.
सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४**

विषय क्रमांक- ३४ शनिवार दि.०४/०८/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीकल विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या सेवानिवृत्त इंजिनिअर यांना मुदतवाढ मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभाग.

**संदर्भ :-** १) मा.आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्ताव दि.०२/०२/२०१८

२) मा.स्थायी समिती सभा क्र.७ दि.०६/०२/२०१८

३) मा.उपायुक्त यांचे जा.क्र.इले.विभाग.११३२ दि.०७/०२/२०१८

उपायुक्त विषयान्वये प्रस्तावित करण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेले वरील संदर्भक्र.१ ते ३ नुसार २ सेवा निवृत्त इंजिनिअर यांचे संदर्भिय कार्यालयाने आदेश सहा महिन्याकरीता दिलेला होता.सदर सेवानिवृत्त इंजिनिअर यांची कंत्राटी करार पध्दतीने केलेली ६ महिन्याची मुदत दि.१७/७/२०१८ रोजी संपत आलेली आहे.संपुर्ण शहर हद्दीमध्ये पथदिवे मेटेंनन्स करता कर्मचारी संख्या अपूर्ण आहे.अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीकल विभागाकडील असलेल्या सेवानिवृत्त इंजिनिअर इलेक्ट्रीक विभागाने कंत्राटी करार पध्दतीने घेतलेला आहे.तथापि सदर इंजिनिअर यांनी इलेक्ट्रीक विभागाकडील असलेले संपूर्ण शहरातील विज बिलाचे व मीटरचे सर्व्हे करून एम.एस.ई.बी. शी पत्रव्यवहार चालू असून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल या उद्दीष्टिाने व्यवस्थितरित्या काम करित आहेत.

तरी कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या २ सेवानिवृत्त इंजिनिअर यांची मुदत दि.१८/०१/२०१८ पासून दि.१७/०७/२०१८ च्या सहा महिने वरील संदर्भिय आदेशानुसार संपत असल्याने त्यांना ६ महिन्याकरिता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढीस मंजुरी मिळणेस व सदरची नियुक्तीस मंजुरी मिळणेकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मंजूरी मिळणेस आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्रय की,सोबतच्या अहवालानुसार प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीकल विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या सेवानिवृत्त इंजिनिअर यांना मुदतवाढ मिळणेबाबत ऑफिस रिपोर्टआहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- यांचे सुध्दा काम चांगले आहे.बंद मिटरचा शोध घेवून जादा येणारे महानगरपालिकेचे बील त्यांच्या मुळे कमी झाले आहे.त्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा झालेला आहे.

मा.सभापती साहेब :- सध्या त्यांच्या कडे कोणते काम आहे?

इले.विभाग प्रमुख श्री.इथापे :- महानगरपालिकेच्या नांवावर जे फॅल्टी मीटर शोधने व दुरूस्ती करीता महावितरण कडे पाठपुरवा करणे इत्यादी स्वरूपाचे कामकाज त्यांच्या कडे आहे.

अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे :- इलेक्ट्रीक विभागाकडे सध्या कमी स्टाफ असल्याने व त्यांचे कामकाज चांगले असल्याने मुदतवाढ देणे योग्य होईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेले निवृत्त इंजिनिअर हे संपुर्ण शहर हद्दीमध्ये पथदिवे मेटेंनन्स करता कर्मचारी संख्या अपूर्ण असल्याने कामाची निकड पहाता तसेच संपूर्ण शहरातील विज बिलाचे व मीटरचे सर्व्हे करून एम.एस.ई.बी. शी पत्रव्यवहार चालू असून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल या उद्दीष्टिाने व्यवस्थितरित्या काम ते करीत असल्याने कंत्राटी करार पध्दतीने केलेल्या नेमणूकीस त्यांची मुदत संपत असल्याने त्यांना मुदत समाप्ती नंतर पुढील ६ महिन्याकरिता कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक देणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेले निवृत्त इंजिनिअर हे संपुर्ण शहर हद्दीमध्ये पथदिवे मेटेंनन्स करता कर्मचारी संख्या अपूर्ण असल्याने कामाची निकड पहाता तसेच संपूर्ण शहरातील विज बिलाचे व मीटरचे सर्व्हे करून एम.एस.ई.बी. शी पत्रव्यवहार चालू असून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल या उद्दीष्टिाने व्यवस्थितरित्या काम ते करीत असल्याने कंत्राटी करार पध्दतीने केलेल्या नेमणूकीस त्यांची मुदत संपत असल्याने त्यांना मुदत समाप्ती नंतर पुढील ६ महिन्याकरिता कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक देणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका